**येणाऱ्या काळात महाराष्ट्राचे चित्र बदलून टाकु : बावनकुळे** >>पान 2

**आग लागली की, लावण्यात आली हा संशय, आमदार जितेंद्र आव्हाड यांचा पत्रकार परिषदेत आरोप** >>पान 3

**मुंबईत 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट'चे भव्य आयोजन** >>पान 4


**सुविचार**

यशस्वी होण्यासाठी धैर्य आणि संयम लागतो.


दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com    मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 256 ■ मंगळवार, दि. 29 एप्रिल 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006





'कपडे काढून तू, इनरवेअरमध्ये माझ्या समोर'; प्रसिद्ध अभिनेत्रीचा खळबळजनक खुलासा

आतील पान


# एसटी महामंडळाची श्वेतपत्रिका, मेडिक्लेम योजना, हॉटेल थांब्यासाठी नवं धोरण

## परिवहन मंत्री तथा एस टी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक निर्देश



**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी : एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती समजून घेण्यासाठी, तसेच भविष्यातील नियोजना करता, एक आर्थिक श्वेतपत्रिका तयार करावी. असे निर्देश परिवहन मंत्री तथा एस टी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला दिले आहेत. आज एसटीच्या मुख्यालयात झालेल्या बैठकीमध्ये ते बोलत होते. यावेळी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी गिरीश देशमुख यांचे सह सर्व खात्याचे प्रमुख उपस्थित होते.**

पुढे बोलताना ते म्हणाले, सुमारे १० हजार कोटी संचित तोटा सहन करणाऱ्या एसटी महामंडळाला कर्मचाऱ्यांचे वेतन, वाहन खरेदी, टायर खरेदी, इंधन खरेदी, स्थानकाचे नूतनीकरण व इतर आस्थापना खर्चासाठी दररोज आर्थिक कसरत करावी लागते. कर्मचाऱ्यांचे देणी, भविष्य निर्वाह निधीचे हप्ते, कामगार करारातील प्रलंबित देणी या साठी महामंडळाला पैशाची गरज आहे. याबरोबरच महामंडळाला इंधन, वस्तु व सेवा पुरविणाऱ्या संस्थांची थकीत देणी या सर्व घटकांचा विचार करून एसटी महामंडळाला सध्या किती उत्पन्न मिळते? किती खर्च येतो? तसेच किती देणी बाकी आहेत. या सर्वांचा लेखा-जोखा मांडणारी एक श्र्वेतपत्रिका काढणे अत्यंत आवश्यक असून त्यातून एक आर्थिक शिस्त निर्माण करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले.

नुकत्याच संपन्न झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये मुख्यमंत्री महोदय यांनी सभागृहाला आश्र्वासित केल्याप्रमाणे १३१० बसेस भाडेतत्त्वावर घेण्याच्या एकूण प्रकरणाची चौकशी तटस्थ व्यक्तीमार्फत केली जाईल, तशा सूचना अतिरिक्त मुख्य सचिव (परिवहन) यांना देण्यात येतील. अशी माहिती मंत्री सरनाईक यांनी यावेळी दिली.



कर्नाटक परिवहन महामंडळाच्या धर्तीवर सर्व कर्मचाऱ्यांना एकाच छताखाली वैद्यकीय सेवा सुविधा व वैद्यकीय चाचण्या करून मिळतील अशी कॅशलेस मेडिक्लेम योजना धर्मवीर आनंद दिघे यांच्या नावाने सुरू करावी, असे निर्देश मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी एसटी प्रशासनाला दिले.

लांब पल्ल्याच्या प्रवासामध्ये एसटी बसेस ज्या हॉटेल-मोटेलवर थांबतात, तेथे प्रवाशांना दिल्या जाणाऱ्या सेवा सुविधा बाबत अनेक तक्रारी निर्माण होत असून या हॉटेल-मोटेलना परवानगी देत असताना यापुढे कडक धोरण स्वीकारले जाईल. ज्यामध्ये प्रवाशांच्या तक्रारीनुसार संबंधित हॉटेलवर दंडात्मक कारवाई बरोबरच त्यांचा थांबा रद्द करण्याची देखील तरतूद असणार आहे. तसेच ज्या विभागात अशा हॉटेल-मोटेल संदर्भात तक्रार येतील त्या विभाग नियंत्रकांना देखील जबाबदार धरून त्यांच्यावर देखील प्रमादिय कारवाई करण्याची तरतूद या नव्या धोरणात असणार आहे. अशी माहिती सरनाईक यांनी यावेळी दिली.

एसटी प्रशासनाची कार्यक्षमता वाढवण्यासाठी त्या त्या क्षेत्रातील तज्ञांचा सल्ला अत्यंत महत्त्वाचा असून अशा तज्ञांना एसटी महामंडळाच्या अधिकारी व प्रशासनाला मार्गदर्शन करण्यासाठी नेमले जावे अशा सूचना मंत्री प्रताप सरनाईक यांनी या बैठकीत दिल्या. त्यानुसार बांधकाम, वाहतूक, कामगार, आर्थिक व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रासाठी प्रत्येकी एक अशा प्रकारे पाच तज्ञांची नियुक्ती लवकर महामंडळातर्फे करण्यात येणार आहे.

# जळगावमध्ये ट्रकने कट मारल्याने बस खड्ड्यात, मोठा अनर्थ टळला



निंभोरेहून जळगावला येणारी एसटी बस आहुजा नगर स्टॉपजवळ ट्रकने कट मारल्यामुळे समांतर रस्त्याच्या खड्ड्यात उतरली. सुदैवाने बस झाडाझुडपांमध्ये अडकली आणि मोठा अनर्थ टळला. बस पलटी होऊन खड्ड्यात पडली असती तर मात्र मोठी दुर्घटना झाली असती. बसमध्ये ४० ते ५० प्रवासी होते, मात्र कुणालाही दुखापत झाली नाही. ट्रक चालक घटनास्थळावरून फरार झाला असून अपघातामुळे प्रवासी व चालक-वाहक घाबरले होते. घटनास्थळी बघ्यांची मोठी गर्दी जमली होती.

# उमरखेडच्या चिल्ली घाटात द बर्निंग ट्रॅव्हल्स चा थरार !

**दैनिक आपला विदर्भ**

**उमरखेड/प्रतिनिधी :** कर्नाटक राज्यात जाणाऱ्या एका १७ सीटर ट्रॅव्हल्स ने अचानकपणे तालुक्यातील चिल्ली घाटात आज दुपारी अडीच वाजता दरम्यान अचानक भेट घेतल्याने एकच तारांबळ उडाली दरम्यान पेट घेतल्या बरोबर प्रसंगावधान राखून ट्रॅव्हल्स चालकांनी सर्व प्रवाशांना ताबडतोब माहिती देऊन खाली उतरवले व रस्त्याच्या कडेला जाऊन उभे राहिल्याने या थरारक द बर्निंग ट्रॅव्हल्स मधून पंधरा प्रवासी सुखरूप बचावले आहेत मात्र जोपर्यंत अग्निशामक दल उमरखेडला पाचरण करण्यात आले होते तोपर्यंत ट्रॅव्हल्स ही पूर्णता: आगीत होरपळुन खाक झाली होती.

कर्नाटक मधून केए . २९ एन . ११६६ ही १७ सीटर ट्रॅव्हल्स काही दिवसा अगोदर परयाग राज येथे अयोध्या दर्शनासाठी गेली होती .आज दुपारी परतीला जात असताना महागाव येथून निघताच १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या चिल्ली घाटातील योगायोग ढाब्याजवळ अचानकपणे ट्रॅव्हल्सच्या समोरचा टायर हा ब्लास्ट झाल्यामुळे चालकाने प्रसंगावधान राखून गाडी रस्त्याच्या कडेला घेण्याचा प्रयत्न केला असता गाडी ही रस्त्याच्या कडेवर आदळली . गाडी आदळताच त्यावेळेस समोरच्या भागातून पेट घेण्यास सुरुवात केली. चालकांच्या गाडी पेट घेतल्याचे समजताच सर्वप्रथम प्रवाशांना तातडीने उतरण्याच्या



■ **ट्रॅव्हल्स मधील १५ प्रवासी सुखरूप**
■ **सुदैवाने जीवित आणि टळली**

सूचना दिल्या.यामुळे त्यांचा जीव कसा बसा वाचला परंतू गाडीने अवघ्या दोन मिनिटांच्या आतच संपूर्ण पेट घेतला . ही घटना घडली त्यावेळेस मात्र इंधनाची टाकी फ ुटली नसल्यामुळे तो पुढील अनर्थ टळला दरम्यान रस्त्याने ये जा करणाऱ्या पैकी शिंदे सेनेचे प्रवक्ते चितांगराव कदम यांनी तात्काळ उमरखेड नगरपरिषद च्या अग्निशमन दलाला याची माहिती दिली असता अग्निशामक दलाला पोहोचण्यासाठी काही वेळ लागला तोपर्यंत मात्र आगीने रुद्ररूप धारण केले होते. अग्निशामन दलाचे कर्मचारी प्रयत्न करीत होते मात्र तोपर्यंत ट्रॅव्हल्सचा पूर्ण सांगाडा झाला होता .आगीचे डोंब हवेत उडत होते. हे भयानक दृष्य दिसत असतानाच या दुर्घटनेत मात्र जीवितहानी झाली नाही त्यामुळे बघणाऱ्या नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे . घटनेची माहिती मिळताच उमरखेड पो . स्टे . चे पिएसआय भास्कर दरणे , पोलीस कॉ . हनुमंत मुसळे घटनास्थळी दाखल झाले . त्यानंतर पोलिसांनी ट्रॅव्हल्स ही आगीत जळून भस्मसात झाल्याने त्यांनी दुसऱ्या वाहनाची व्यवस्था करीत सर्व प्रवाशांना त्या वाहनात टाकून त्यांना कर्नाटक राज्याकडे रवाना केले . दरम्यान या घटनेबाबत पुढील तपास हे उमरखेड पोलीस करीत आहे .

# वॉर रूमच्या धर्तीवर प्रोजेक्ट मॅजमेंट सुरु

## म्हाडाचे उपाध्यक्ष, सीईओ संजीव जयस्वाल यांची पत्रकार परिषद

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** वेबसाईड आणि डॅशबोर्ड चे उद्घाटन करण्यात आले असून आजपासून लाईव्ह होणार आहे.सर्व अप्लिकेशन करता येणार त्यात सर्व माहिती मिळणार आहे.यूजर फ्रेंडली ही वेबसाईट आहे. इंग्रजी मराठी दोन्हीमध्ये अप्लिकेशन करता येणार आहे. म्हाडाचे सर्व महत्त्वकांक्षी प्रकल्प आहेत. वॉर रूमच्या धर्तीवर प्रोजेक्ट मॅजमेंट सुरु केले आहे. अशी माहिती म्हाडाचे उपाध्यक्ष तथा सीईओ संजीव जयस्वाल यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

यावेळी ते म्हणाले की,सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारी लक्षात घेता सर्व अधिकारी यांच्याशी सॉल्ट ओपन करुन तुम्हाला माहिती दिली जाईल. कोंकण बोर्ड प्राधिकरण बोर्ड एकत्र येणार आहे.डीजे प्रवेश आहे, टाइम करता येणार सर्व माहिती फेस आयडी असेल वेळ वाचणार आहे.मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या संकल्पना पाहता ३० लाख २२ लाख स्लम एरिया असेल. आज दुपारी चार वाजता दुसरे सेमिस्ट ठरविण्यात आले आहे. दैनंदिन कामकाजात काय सुधारणा करता येईल ह्या घटकांमध्ये जास्तीत जास्त युनिट कसे वाढवता येईल, आर्टिफिशल चे जे स्वप्न आहे ते वापरून आपली सुविधा वाढवता येईल. एआयचा वापर करून आर्टिफिशलचे स्वप्न आहे.राईट टू सर्व्हिसमध्ये आणखी सुविधा वाढवतोय.१५ कोटी डॉक्युमेंट पब्लिक डॉक्युमेंट ने उपलब्ध होईल. बीडीडीचे नियोजन आहे.



तांत्रिक मुद्दा आलेला बीएमसीचा पत्रव्यवहार करुन विषय सुटत न्हवता, मुख्यमंत्री यांच्याशी बैठक झाली त्यांनी बीएमसी आयुक्तांना आदेश दिले होते.

पंधरा ते सोळा हजार गिरणी कामगारांना घर देण्यात आली आहेत. ऑनलाइन ॲप तयार केलेला त्यात एक लाख गिरिणी कामगार पात्र झाले आहेत. कामगारांची मागणी पाहता तेवढी घर उपलब्ध करणे कठीण आहे. मात्र सीएम यांनी आदेश दिले आहेत, तशी चाचपणी सुरु आहे.विधानसभा निवडणूकीपूर्वी सेलू आणि वागणी गाव चा प्रस्ताव आला आहे.पूर्वीचा जीआर आहे.त्याप्रमाणे गिरणी कामगारांकडून साडे नऊ लाख आणि साडे पाच महाडा कडून तसेच इतर काही सरकारला सांगितले आहे. सबंधीत व्यक्ती बसून किमंती कमी करण्याचा विचार केला जाईल.

उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. याबाबत लवकरच निर्णय घेतला जाणार आहे. सीएसपी केंद्र उद्घाटन हे सर्वसामान्य नागरिकांसाठी आहे. त्यात महाडा चे प्रतिनिधित्व असेल. म्हाडामध्ये ई ऑफिस न्हवते आता आम्ही ते ओपन केले त्याच्या माध्यमातून काम सुरु आहे. पावणे दोन वर्षात १३ लॉटरी महाराष्ट्रात काढल्या आहेत.आम्ही दिवाळी पूर्वी सुमारे ५ हजार घर मुंबईसाठी लॉटरीत काढू,आज रोजी साडे अकरा ते बारा हजार घरे पडून आहेत. वेगवेगळ्या पद्धतीने पॉलिसी काढत आहे. रेंटल मध्ये देण्यात येईल तसाही प्रस्ताव काढलेला आहे.९० टक्के घर विकली जातील. अशी माहिती म्हाडाचे उपाध्यक्ष, सीईओ संजीव जयस्वाल यांची पत्रकार परिषदेत दिली.



# ट्रकची कट लागल्याने शुल्लक वादातून एकाची हत्या, आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी :** एका ट्रकला दुसऱ्या ट्रकची कट लागल्याने शुल्लक वादातून ट्रक चालकाची हत्या करण्यात आली. ही घटना जरीपटका पोलीस स्टेशनच्या हद्दीत घडली असून या प्रकरणात पोलिसांनी अल्पवयीन मुलासह एकाला अटक केली. वंश उर्फ अतुल डहारे असे मृत ट्रक चालकाचे नाव आहे. तर निलेश सहारे असे आरोपीचे नाव आहे. प्रथम अतुलच्या ट्रकची निलेशच्या ट्रकला कट लागली त्यामुळे चिडलेल्या निलेशनेही अतुलच्या ट्रकला कट मारली. त्यानंतर तथागत चौकात दोघांनी ट्रक उभे करून बाहेर आले. दोघांन मध्ये वाद सुरू झाला. निलेशच्या ट्रकवर क्लीनर म्हणून काम करणाऱ्या क्लीनरने अतुलच्या पोटावर वार केला.यातच त्याचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती पोलिसांना मिळाल्यावर पोलिसांनी दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले.

## राज्य पाणी टंचाईच्या सावटाखाली...

कडक उन्हाळ्यामुळे महाराष्ट्रात जवळपास १६ जिह्यांमध्ये पाणी टंचाईचे सावट निर्माण झाले आहे. गतवर्षी उशिरा सुरू झालेल्या पावसाने दमदार हजेरी लावल्याने यंदा पाण्याबाबत महाराष्ट्र चिंतामुक्त असेल असे वाटत होते. मात्र उन्हाच्या तीव्र झळांनी फार मोठ्या प्रमाणावर पाण्याचे बाष्पीभवन झाले. धरणातील पाणीसाठे आटले. पश्चिम महाराष्ट्राला याचा मोठा फटका बसेल. काही ठिकाणी फक्त १० टक्के साठा राहील, मराठवाडा आणि पश्चिम विदर्भ होरपळतोय. कोकणात देखील टँकर सुरू झाले आहेत. ठिकठिकाणी पिण्याचे पाणी, जनावरांना चारा, त्यासाठी छावण्या उभ्या कराव्या लागणार आहेत. सरकारसमोर हे मोठे आव्हान असेल. सरकारपुढे अचानक कोणती आव्हाने उभी राहतील याचा नेम नसतो. काश्मिरात पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या अतिरेकी हल्ल्यांमध्ये महाराष्ट्रातील पर्यटकांनाही आपले प्राण गमवावे लागले. त्यांना, त्यांच्या कुटुंबीयांना व अडकून पडलेल्या पर्यटकांना महाराष्ट्रात परत आणण्याचे आव्हान उभे राहिले. संकट समयी सर्वात आधी धावून जाण्याच्या आपल्या परंपरेला जोपासत माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तातडीने काश्मीर गाठले. त्यांच्या पाठोपाठ राज्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री म्हणून गिरीश महाजन यांनीही काश्मीर गाठले. या ठिकाणी मदत कार्य कसे सुरु आहे याची माहिती एकाच वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह त्यांच्या मंत्रिमंडळातील हे दोन मंत्री देत होते. लोकांना महाराष्ट्रात पाठवण्यासाठी प्रयत्न करत होते. मात्र दुर्दैवाने या सर्व प्रकाराला सत्ता स्पर्धेच्या दृष्टीने पाहिले गेले. त्याबाबत दोन्ही पक्षांमध्ये चढाओढ सुरू आहे अशा पद्धतीने सरकारातील या मंडळींचे वर्तन होतेच. पण अशा संकटकाळी त्याची उघड वाच्यता होण्याची आवश्यकता नव्हती. असो, आता या संदर्भात मृतांच्या कुटुंबियांच्या भेटीगाठी आणि त्यांचे दुःख जाणू घेण्यात नेते व्यस्त आहेत हे ही थोडके नाही. सामान्य माणसांच्या दुःखाचे सरकारलाच नव्हे तर महाराष्ट्रातील प्रत्येक पक्षांना किती महत्त्व वाटते हे त्यातून अनुभवायला येणे सुद्धा जनतेच्या दृष्टीने दिलासादायकच. पण त्यानंतर विविध पक्षांच्या मंत्री, आमदार आणि इतर मंडळींची जी वक्तव्ये येत आहेत त्यांची आवश्यकता नाही. ही अवकाळी बाष्कळ बडबड सर्वपक्षीयांनी प्रयत्नपूर्वक थांबवण्याची गरज सर्वसामान्यांना वाटू लागली आहे. उन्हाच्या तीव्रतेमुळे पश्चिम महाराष्ट्रातील धरणांमध्ये ४१.३० टक्के इतकीच पाणी पातळी शिल्लक आहे. गेल्या महिनाभरात ३२ प्रमुख धरणांमधील पाणी पातळी १८ टक्क्याने घटली आहे. एप्रिल शेवटचा आठवडा, मे पूर्ण आणि जूनचा पहिला आठवडा इतकाकाळ हा भाग टिकाव धरणार का? याची चिंता व्यक्त केली जात आहे. अलीकडच्या काळात पावसाळा जवळपास एक महिना पुढे गेला असल्याने जुलै महिन्यापर्यंत हे पाणी वाचवणे हे मोठे आव्हानाचे काम आहे. संपूर्ण राज्यात अशीच परिस्थिती बिघडत चालली आहे. विहिरी, तलाव आटत चालले असून बोअरचे पाणी अधिक खोलवर गेले आहे. त्यामुळे हे एक मोठे आव्हान बनणार आहे. प्राधान्याने सरकारला यावरच काम करावे लागेल असे दिसते. वाढत्या तापमानाचा पश्चिम विदर्भातील पाच जिह्यांत जलसाठ्यांना मोठा फटका बसला आहे. २८९ प्रकल्पात ३५ टक्के पाणी साठा आहे. अनेक पाणी प्रकल्प कोरडे पडण्याच्या मार्गावर आहेत. चंद्रपूर शहरात १८० टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. अमरावती जिह्यातील चिखलदरा आणि चांदुर रेल्वे तालुक्यातील सात गावांमध्ये टँकरने पाणीपुरवठा सुरु करण्यात आला आहे. जिह्यातील ७७६ गावांसाठीच्या तातडीच्या उपायोजना साठा ५० टक्केवरच असल्याने नियोजन कोलमडले आहे. सलग तीन दिवस अमरावतीच्या तापमानात वाढ झाल्याने पाणी टंचाईचे सावट भीषण होण्याची शक्यता आहे. तर जनावरांच्या पाण्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अमरावती जिह्यातील चिखलदराच्या पायथ्याशी गावांमध्ये भीषण पाणीटंचाई आहे. मेळघाटातील अनेक गावांमध्ये तीव्र पाणीटंचाई जाणवत आहे. अनेक विहिरींनी तळ गाठला आहे. तर तलाव कोरडेठाक पडले आहेत. आदिवासींवर पाण्यासाठी वणवण भटकण्याची वेळ आली आहे. यवतमाळ जिह्यात ७९ हजार नागरिकांना पाणीटंचाईचे चटके बसत आहेत. प्रशासनाकडून ५७ विहिरीचे अधिग्रहण करण्यात आले आहे. तर जिह्यातील ३३० गावात पाणीटंचाईचा फटका बसला आहे. इथल्या जिह्यांची स्थिती गंभीर आहे. ती अशी : अमरावती जिल्हा – ५६ प्रकल्प, ४६.२९ टक्के जल साठा, २८ प्रकल्प कोरडे, टँकर पाणी पुरवठा संख्या १२. यवतमाळ जिल्हा ७४ प्रकल्प, ३२.९७, टँकर संख्या ६. अकोला जिल्हा ३० प्रकल्प, ३१.५०. वाशिम जिल्हा ७८ प्रकल्प, २५.१७ साठा. बुलढाणा जिल्हा ५१ प्रकल्प, २७.७ साठा, टँकर संख्या ३१. अशाच पद्धतीने मराठवाड्याच्या पाचवीला तर दुष्काळच पुजलेला आहे. गेल्यावर्षी जून महिन्यात मराठवाड्यातील २० लाख लोकसंख्या टँकरवर जगत होती. यंदाची एप्रिल शेवटच्या आठवड्यातील टँकरची आकडेवारी अशी आहे : छत्रपती संभाजीनगर ७४२, जालना ५१३, परभणी ३१, हिंगोली १०, नांदेड ३९, बीड ४३६, लातूर ४४, धाराशिव १२३, मराठवाडा एकूण १९३८. इथे जालना जिह्यातील ६४ प्रकल्पापैकी ३ प्रकल्प पूर्णतः कोरडे पडले असून २४ प्रकल्पांमध्ये केवळ मृत साठा शिल्लक आहे. उन्हाचा पारा वाढत चालल्याने पाण्याचे बाष्पीभवन होत आहे. परिणामी झपाट्याने पाणी पातळी खाली जात आहे. कोकणात रत्नागिरी जिह्यात सुद्धा टँकर सुरू आहेत. उन्हाळ्यात इथली परिस्थिती सुद्धा गंभीर बनते. राज्याच्या सर्व भागात यंदा चांगला म्हणजे १०५ टक्के पाऊस पडेल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. ही आनंदाची आणि दिलासादायक बाब आहे. मात्र त्याचवेळी पावसाने वेळेवर येणे देखील अपेक्षित आहे. उन्हाच्या तीव्रतेमुळे पाणी आटण्याचे प्रमाण यंदाच्या वर्षी खूपच वाढले आहे. शिल्लक पाणीसाठा पुरवून वापरायचा म्हटले तरी सूर्य कोपला तर हे साठवलेले पाणी उडून जाण्याचा धोका आहे. निसर्गाचे हे गंभीर संकट बरेच काही सांगणारे आणि सरकारला अत्यंत नजीकच्या भविष्यकाळात याबाबतीत एक ठोस धोरण आखावे लागणार, हे स्पष्ट करणारे आहे. यासाठी झटपट कृती करावी लागणार आहे. विशेष म्हणजे हे करत असतानाच दिलासादायक योजना राबवून लोकांना त्यांच्या किमान गरजा भागतील इतपत व्यवस्थाही करावी लागणार आहे. हे खूप मोठे आव्हान आहे. सरकार याला लवकरात लवकर गांभीर्याने घेईल अशी आशा आहे.

# येणाऱ्या काळात महाराष्ट्राचे चित्र बदलून टाकु : बावनकुळे

## रिसोड येथे भाजपाचा नव संकल्प सभा कार्यकर्ता संवाद मेळावा संपन्न



**रिसोड/प्रतिनिधी** :लाडकी बहीण योजना संदर्भात विरोधक चुकीचा संदेश पसरवत आहेत. आज काँग्रेसची हालत खूपच खराब झालेली आहे. त्यांच्याकडे विरोधी पक्ष नेता सुद्धा राहिलेला नाही. महाविकास आघाडी भाजप सरकारच्या सुरळीत सुरू असलेल्या कामाबद्दल चुकीच्या संदेश पसरवून लोकांना भ्रमित करत आहे. भाजप सरकार जाहीरनाम्याप्रमाणे काम करत आहे.निवडणुकीत दिलेले आश्वासन हे पूर्ण करण्यासाठी ताकतीने कामाला लागलेला आहे. शेतकऱ्यांची वीज समस्या असो शेतकऱ्यांचे पांदण रस्ते असो वा अन्य समस्या, या सर्व बाबतीत योग्यरीत्या काम भाजप सरकार करत आहे येणारा काही काळात आम्ही महाराष्ट्राचे चित्र बदलून टाकू रिसोड मतदार संघात भाजपचा आमदार नसला तरी मतदारसंघाच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही, असे आश्वासन भाजप प्रदेशाध्यक्ष आणि राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी २७ एप्रिल रोजी रिसोडकरांना दिले येथील संत सातारकर महाराज संस्थानमध्ये आयोजित नवसंकल्प सभा आणि कार्यकर्ता संवाद मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी खा. अनुप धोत्रे, आ. श्याम खोडे, आ. सईताई डहाके, श्याम बडे, बाळासाहेब खरात, गजाननराव लाटे, वामनराव देशमुख, गजानन पाचरणे, स्वप्नील सरनाईक यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, रिसोड मतदारसंघात भाजपचा आमदार नसतानाही अ‍ॅड. नकुल देशमुख यांच्या मागणीनुसार मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला आहे. यापुढेही निधी कमी पडू देणार नाही. या मतदारसंघाच्या विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. शहराच्या विकासासाठी मांडलेल्या तिनही मागण्या लवकरच मंजूर करण्याचे आश्वासन ना. बावनकुळे यांनी दिले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात अ‍ॅड. नकुल देशमुख यांनी या मेळाव्याचा उद्देश सांगितला. मेळाव्याला भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, माजी जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, नागरिक, महिला बहुसंख्येने उपस्थित होते.

रिसोड मतदारसंघात भाजपने माजी खासदार अनंतराव देशमुख यांना तिकीट न दिल्या बाबतचा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पहिल्यांदाच खुलासा केला. ते म्हणाले, महायुतीत रिसोडची जागा ऐनवेळी शिवसेनेला (शिंदे गट) सुटल्यामुळे आमचा नाईलाज झाला. या बाबीची खंत आम्हाला आहे.भविष्यात अनंतराव देशमुख यांचा सन्मान केला जाईल, असा शब्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माझ्या समक्ष दिला आहे, असे ना. बावनकुळे म्हणताच, कार्यकर्त्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात या शब्दांचे स्वागत केले.

### 'वेव्हज परिषद–२०२५'निमित्त 'जय महाराष्ट्र'कार्यक्रमात


## सचिव डॉ. अन्बळगन पी. यांची मुलाखत

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'जय महाराष्ट्र'कार्यक्रमात 'ऑडिओ व्हिज्युअल अँड एंटरटेनमेंट समिट'वेव्हज–२०२५ परिषदेनिमित्त उद्योग विभागाचे सचिव डॉ. अन्बळगन पी. यांच्या विशेष मुलाखतीचे प्रसारण होणार आहे. 'जय महाराष्ट्र'कार्यक्रमात ही मुलाखत मंगळवार दि. २९ एप्रिल २०२५ रोजी दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर रात्री ८.०० वा. तसेच महासंचालनालयाच्या समाजमाध्यमांवर खाली दिलेल्या लिंकवरून ही मुलाखत पाहता येणार आहे. निवेदक सुषमा जाधव यांनी ही मुलाखत घेतली आहे. एक्स- : https://twitter.com/MahaDGIPR, फेसबुक- : https://www.facebook.com/MahaDGIPR, यू ट्यूब- :https://www.youtube.co/MAHARASHTRADGIPR, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून 'ऑडिओ व्हिज्युअल अँड एंटरटेनमेंट समिट'म्हणजेच 'वेव्हज–२०२५' चे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद १ ते ४ मे २०२५ या कालावधीत जिओ कन्व्हेशन सेंटर, बीकेसी, मुंबई येथे होणार आहे. जगभरातील विविध देशांमधील मनोरंजन आणि निर्मितीशी संबंधित क्षेत्रातील मान्यवर यानिमित्ताने एकत्र येणार आहेत. या परिषदेच्या माध्यमातून भारताच्या सर्जनशील शक्तीला, क्रिएटीव्ह इकॉनॉमीला चालना मिळणार आहे. यानिमित्त होणारे नियोजित कार्यक्रम आणि तयारीबाबत उद्योग विभागाचे सचिव डॉ. अन्बळगन पी. यांनी 'जय महाराष्ट्र'कार्यक्रमात माहिती दिली आहे.

## राष्ट्रीय महामार्ग ६ वर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा रास्ता रोको





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राष्ट्रीय महामार्ग ६ वरील खामगावात स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व खासदार राजू शेट्टी यांनी केल होते. राज्यातील शेतकरी अस्मानी सुलतानी संकटाचा सामना करत आहेत. यंदा निसर्गासोबत शासनानेही शेतकऱ्यांची हेळसांड चालवली आहे.

शेत मालाला हमी भाव मिळत नसल्याने बुलढाणा जिल्ह्यातील शेतकरी दिवसागणिक आत्महत्या करत आहेत. शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी द्यावी,अतिवृष्टी व पिकविमा रक्कम शेतकऱ्याच्या खात्यात तात्काळ जमा करावा, अतिवृष्टी व पिकविमा रक्कम बँक कर्मचारी अधिकारी परस्पर कर्जखात्यात जमा करत असल्या कारणाने त्यांच्यावर कार्यवाही करावी,खामगाव तालुका दुष्काळ ग्रस्त जाहीर करावा अशा विविध मागण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अमोल पाटील नेतृत्वात रास्ता रोको करण्यात आला. जोपर्यंत मागण्या पूर्ण होत नाही तोपर्यंत आंदोलन सुरूच राहील असा इशारा यावेळी देण्यात आला होता मात्र पोलिसांनी दबाव तंत्राचा वापर करून त्यांना ताब्यात घेतली होते.

## अक्षयतृतीयेला बालविवाह रोखण्यासाठी उपाययोजना लागू; बालविवाह केल्यास शिक्षा आणि दंडाची तरतूद

दैनिक आपला विदर्भ



**बुलढाणा/प्रतिनिधी :** अक्षय तृतीयाच्या दिवशी बाल विवाह होण्याची शक्यता आहे. त्यामुळे बुधवार, दि. ३० एप्रिल रोजी अक्षयतृतीयाच्या दिवशी जिल्ह्यातील बालविवाह रोखण्यासाठी बालविकास प्रकल्प अधिकारी, ग्राम पंचायत अधिकारी, पोलीसपाटील, अंगणवाडी सेवीका यांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ लागू असून याचे नियम महाराष्ट्र बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २०२२ देखील लागू आहेत. या अधिनियमानुसार बालविवाह आयोजित करणे अजामीनपात्र गुन्हा आहे. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६ नुसार बालविकास प्रकल्प अधिकारी यांना शहरी, तर ग्रामीण भागासाठी ग्राम पंचायत अधिकारी यांना बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून घोषित केले आहे. तसेच ग्रामीण भागाकरीता अंगणवाडी सेविका, तसेच शहरी भागाकरिता पर्यवेक्षिकांना सहाय्यक बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

अक्षयतृतीया या दिवशी जिल्ह्यात बालविवाह होऊ शकतात. यास प्रतिबंधक म्हणून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. पुरुषाने बालवधूशी विवाह केल्यास सदर पुरुषाला दोन वर्षापर्यंत सक्त मजुरीची कैद आणि एक लाख रुपयांपर्यंतचा दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. तसेच जाणीवपूर्वक बालविवाह ठरविणाऱ्यास, सोहळा पार पाडणाऱ्यास किंवा प्रोत्साहन देणाऱ्यास दोन वर्षापर्यंत सक्त मजुरीची कैद आणि एक लाख रुपयांपर्यंतचा दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. बालविवाह झाल्यास, संबंधित वर-वधूंचे आई-वडिल किंवा पालक व अन्य नातेवाईक, मित्र परिवार, मंदिरातील विश्वस्त, फोटोग्राफर, प्रिंटिंग प्रेस, वाजंत्री, सभागृह व्यवस्थापक, कॅटरिंग अशा सर्वांनी बालविवाह घडविण्यास प्रत्यक्ष मदत केली किंवा तो रोखण्यासाठी प्रयत्न केले नाहीत, जे अशा विवाहात सामील झाले होते, अशा सर्वांना दोन वर्षांपर्यंत सक्त मजुरीची कैद व एक लाख रुपयांपर्यंतचा दंड होऊ शकतो. सोबत ग्रामसेवकांनी जन्म दाखल्याची खोटी नोंद केल्यास त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येणार आहे.

दि. ३० एप्रिल २०२५ रोजीच्या अक्षयतृतीयेला संभावित बालविवाहाच्या घटना रोखण्यासाठी सर्व यंत्रणांनी बालविवाह प्रतिबंधात्मक अधिनियमातील तरतुदीनुसार बालविवाह रोखण्याबाबत जनजागृती करण्यात आली आहे. तसेच बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ ची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या आहेत. बालविवाह बाबत काही माहीती असल्यास टोल फ्रीकमांक १०९८ वर संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांनी केले आहे.

# कॅन्डल मार्च काढून पहलगाव हल्ल्यातील मृतकांना श्रद्धांजली

## पाकिस्तान विरोधात घोषणाबाजी शेकडो नागरिकांचा कॅन्डल मार्चमध्ये सहभाग

दैनिक आपला विदर्भ



**डोणगाव/प्रतिनिधी :** जम्मू काश्मिर मधील पहलगाव येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात महाराष्ट्रातील ६ व देशातील २२ अशा एकूण २८ पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे संपूर्ण देशात पाकिस्तान विरोधात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. तसेच ठिकाणी कॅन्डल मार्च काढून दहशतवादी हल्ल्यातील मूर्तकांना श्रद्धांजली अर्पण केली जात आहे.डोणगाव येथेही नागरिकांच्या वतीने कॅन्डल मार्च काढून पहलगाव हल्ल्यातील मृतकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्याचबरोबर पाकिस्तान विरोधात घोषणाबाजी करून दहशतवाद्याविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. जम्मू काश्मिर येथील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २८ पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. या पर्यटकांच्या श्रद्धांजली वाहण्यासाठी डोणगाव येथे कॅन्डल मार्च काढण्यात आला.यावेळी गावातील मुख्य मार्गाने हा कॅन्डल मार्च काढण्यात आला. यावेळी दहशतवादी पाकिस्तान यांचा जाहीर निषेध करण्यात आला व पाकिस्तान मुर्दाबाद असे नारे सुद्धा देण्यात आले. सदर कॅन्डल मार्चमध्ये डोणगाव येथील सर्व जाती धर्मातील शेकडो नागरिकांनी सहभाग घेतला होता. यावेळी नागरिकांनी दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ तीव्र संताप व्यक्त करीत पाकिस्तान मुर्दाबादच्या घोषणा दिल्या. त्याचबरोबर दहशतवादी कारवाया करणाऱ्या पाकिस्तान विरुद्ध शासनाने कठोर भूमिका घेत कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. या कॅनल मार्चमध्ये डोणगाव येथील सर्व जाती धर्मातील नागरिकांनी सहभाग घेतला होता.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### कुडाळ तालुक्यातील घोटगे गावांमध्ये भीषण पाणटंचाई





**दैनिक आपला विदर्भ**

**सिंधुदुर्ग/प्रतिनिधी :** तळकोकणात सर्वाधिक पाऊस पडत असला तरी मात्र, जिल्ह्याच्या काही भागांमध्ये भीषण पाणी टंचाईचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. कुडाळ तालुक्यातील घोटगे गावांमध्ये पाणी प्रश्न गेले अनेक दशकापासून कायम आहे. या गावांमध्ये पाटबंधारे विभागाचा कोणताही प्रकल्प नाही.त्यामुळे इथल्या नागरिकांना पावसाच्या पाण्यावर अवलंबून राहावं लागतं आहे.पाऊस गेल्यानंतर पुढच्या काही महिन्यांपासून भीषण पाणी टंचाई भासत आहे.अनेक विहिरीची पाणी पातळी खालावली आहे. दूषित पाण्यामध्ये नागरिकांना वावर करावा लागत आहे.मे महिन्यामध्ये चाकरमानी देखील गावी येण्यास टाळाटाळ करतात.मात्र हे गाव पाणीदार होण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घेऊन उपाय योजना करण्याची मागणी इथल्या गावच्या सरपंच श्रुती घाडीगांवकर यांनी केलीय.

### पहलगाम हल्ल्याविरोधात शिवसेना शिंदे गटाकडून निषेध आंदोलन




**दैनिक आपला विदर्भ**

**भिवंडी/प्रतिनिधी :** जम्मू काश्मीर येथील पहलगाम मध्ये दहशतवाद्यांकडून झालेल्या भ्याड हल्ल्यानंतर संपूर्ण देशातून संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. देशभरात पाकिस्तान विरोधात जोरदार आंदोलन करण्यात येत असून, आज शिवसेना शिंदे गटाकडून पद्मानगर येथे निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी शिवसेना शिंदे गटाकडून पाकिस्तान मुर्दाबादच्या घोषणा देत पहलगाम मध्ये झालेल्या हल्ल्याचा दहशतवाद्यांकडून निषेध करत श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी शिवसेना शिंदे गटाचे अनेक कार्यकर्ते व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### जळगावातील नशिराबाद येथील शेतकऱ्यांना गेल्या पाच महिन्यांपुर्वीच केला ऊस खरेदी; अद्याप कोणताही मोबदला नाही



**दैनिक आपला विदर्भ**

**जळगाव/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील पैनगंगा सहकारी साखर कारखान्याने नशिराबाद आणि बेळी परिसरातील शेतकऱ्यांकडून चार ते पाच महिन्यांपूर्वी ऊस खरेदी करूनही अद्याप मोबदला न दिल्याने शेतकऱ्यांनी आज जळगावचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांची भेट घेतली. थकलेल्या ४० ते ५० लाख रुपयांच्या मागणीसाठी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव घेत न्यायची याचना केली आहे. शेतकऱ्यांनी अनेकवेळा पैनगंगा कारखान्याच्या प्रशासनाशी दूरध्वनीवरून संपर्क साधला, तसेच प्रत्यक्ष भेटी घेऊनही आपल्या हक्काच्या पैशांची मागणी केली. मात्र, कारखाना प्रशासनाकडून त्यांना कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही. टाळाटाळ आणि दुर्लक्षामुळे त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांनी अखेरीस जिल्हाधिकाऱ्यांकडे आपले गाऱ्हाणे मांडले आहे.



# आग लागली की, लावण्यात आली हा संशय

## आमदार जितेंद्र आव्हाड यांचा पत्रकार परिषदेत आरोप

**दैनिक आपला विदर्भ**

**ठाणे/प्रतिनिधी :** इडी पुरावे जाळून खाक झाले आहेत. आग लागली आहे की, लावण्यात आली आहे. हा संशय जनतेच्या मनात येणारच आहे आणि हे परमेश्वराला माहीत. एकदा मंत्रालयात आग लागली होती, तेव्हा ती नैसर्गिक होती. तेव्हा विरोधात असणाऱ्या आणि आत्ता सत्तेत असणारे ओरडत होते. आग लावली आग लावली आता ती आग उलटी फिरली. असे मत आमदार जितेंद्र आव्हाड यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले. यावेळी ते म्हणाले की, शॉर्टसर्किटने लागलेली मंत्रालयातली आग जणूकाही त्यावेळचे मुख्यमंत्री यांनी स्वतः जाऊन लावले, असे त्या वेळेसचे विरोधी पक्षाने आत्ताचे सत्ताधारी म्हणत होते. कुंभमेळ्या डुबकी मारली तर, सगळे पाप नष्ट



होतात. त्या सारखंच आहे. ईडीकडे महत्त्वाचेच पुरावे असतात. ७० हजार कोटीच्या फाईल जाळल्या म्हणून, तुम्ही म्हणत होते. त्याच ७० हजार कोटीच्या फायली इडी कार्यालयात होत्या. मुघल इतिहास वगळला तर,भविष्यातलं पिढीचा इतिहास कमकुवत असेल, असा प्रयत्न केला जात आहे. जवळजवळ ४०० वर्ष मुघलांचे राज्य या भारतावर होते. अनेक लढाया झाल्या राजपूत लढले, मराठी लढले, जाट लढले. मुघलांचा इतिहास बाहेर काढल्यावर पानिपतची लढाई कुणासोबत झाली दाखवणार?, दुसर महायुद्ध झाले, त्यात भर सोमवार झाला इतिहास बाहेर आला. हे जर काढले तर, दुसरे महायुद्ध झाले नाही, असं सांगावे लागेल. इतिहास पुसण्यासाठी नसतो, इतिहासात शिकण्यासारखे असते. शिवाजी महाराजांचा दैदिप्यमान इतिहास आहे. शाहिस्तेखानाची बोट छाटली, अफजलखानाला ठेचला. औरंगजेब आमच्या महाराजांपर्यंत पोहोचलाच नाही, हा इतिहास आहे. इतिहासातून मोगल काढलेत. तर, शिवाजी महाराज लढले कुणासोबत ? ती कधी घराच्या बाहेर पडले नाहीत. काय सांगणार तुम्ही? दुर्दैव आहे ते अशा प्रकारचा राजकारण करण देशाला कुठल्या दिशेला घेऊन जात आहात. इतिहास पुसू नका, त्यातच तुमचे भविष्य दडले आहे. सरकारी योजना दाखवण्यापेक्षा सैनिक भरती करा. सैनिक कमी आहेत, म्हणून पहलगाम झाला.पाकिस्तानी आढळल्यास तुरुंगवास अशी कारवाई केली जाणार आहे. जो प्रचलित कायदा असेल,



त्याच्यानुसार कारवाई करावी, त्यांना कोण नाही म्हणत आहे.असा प्रश्नही यावेळी आव्हाड यांनी केला. पण दर वेळेस आम्ही पाकिस्तान्यांना पकडतो आहे. मग यांचे बगलबच्चे कुठल्यातरी भागात जाणार आणि पाकिस्तानात शोधत बसणार आणि नाटक करत बसणार. आपले राजकारण करत असताना विकासावर बोलायचे नाही. इतकी खोटारडी माणस सत्तेत आली आहेत, की ज्या लाडक्या बहिणींमुळे हे सत्तेत आले आहेत, त्यांचा विसर या भावांना पडलेला आहे. इतके खोटारडे भाऊ जगात कुठे नसतील. अशी टिकाही यावेळी आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केली आहे.

# ‘कपडे काढून तू, इनरवेअरमध्ये माझ्या समोर’; प्रसिद्ध अभिनेत्रीचा खळबळजनक खुलासा

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूडमधील कास्टिंग काऊचच्या धक्कादायक अनुभवांबद्दल अनेक अभिनेत्रींनी आवाज उठवला आहे. आता या यादीत ‘तारक मेहता का उल्टा चष्मा’ फेम अभिनेत्री नवीना बोले हिच्या नावाची भर पडली आहे. तिने प्रसिद्ध दिग्दर्शक साजिद खानवर अत्यंत गंभीर आणि आक्षेपार्ह मागणी केल्याचा खळबळजनक खुलासा केला आहे.

‘हे बेबी’ च्या ऑडिशनवेळी घडलेला प्रकार

अभिनेत्री नवीना बोलेने नुकत्याच एका मुलाखतीत दिग्दर्शक साजिद खानसोबतच्या भेटीचा कटू अनुभव सांगितला. काही वर्षांपूर्वी, साजिद खान त्याच्या ‘हे बेबी’ चित्रपटासाठी कलाकारांची निवड करत होता. त्याने नवीनाला ऑडिशनसाठी बोलावले होते. ठरलेल्या भेटीनुसार नवीना त्याच्या घरी पोहोचली असता, साजिदने तिच्यासमोर एक विचित्र अट ठेवली.

साजिदने नवीनाला तिचे कपडे काढून फक्त अंतर्वस्त्रांमध्ये (इनरवेअर) बसण्यास सांगितले. आपण तिच्या शरीरासोबत किती सहज (कंफर्टेबल) आहोत, हे पाहण्यासाठी ही मागणी करत असल्याचे कारण त्याने दिले. ‘सीआयडी’ सारख्या मालिकांमध्येही दिसलेल्या नवीनाने केलेल्या या आरोपामुळे चित्रपटसृष्टीत पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे.

नवीना बोले म्हणाली, ‘‘माझ्या आयुष्यात मी ज्या एका भयानक माणसाला पुन्हा कधीही भेटू इच्छित नाही, तो म्हणजे साजिद खान. महिलांचा अनादर करण्याच्या बाबतीत त्याने सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत.’’ जेव्हा साजिदने तिला फोन केला तेव्हा ती उत्साहित होती, पण भेटीतील अनुभवाने ती हादरली.

### सरकारने स्ट्राँग ॲक्शन घ्यायला हवी
### एम.आय.एम. अध्यक्ष असदुद्दीन ओवैसी

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** सरकारने सर्वपक्षीय बैठक घेतली, तेंव्हा सर्व विरोधी पक्षांनी सांगितलेले आहे. सरकारने स्ट्राँग ॲक्शन घ्यायला हवी. सरकारला विचार करुद्या. पाकिस्तान मलेरियाची दावा बनू शकत नाही, ते काय बोलणार.असे मत एम.आय.एम.चे अध्यक्ष असदुद्दीन ओवैसी यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.



यावेळी ते म्हणाले की, बिलावल भुट्टो आताच राजनीतीमधे आले आहेत. दहशतवाद्यांनी त्यांच्या आईची गोळ्या घालून हत्या केली. ही गोष्ट त्यांना समजण्याची आवश्यकता आहे. बिलावल यांच्या आईला मारणारे दहशतवादी आणि आमच्या देशातील निष्पापाना मारणारे चांगले का? आय. एस.आय, इसीस असो की, पाकिस्तानातील इतर दहशतवादी संघटना त्यांना असे वाटते की, भारतात हिंदू-मुस्लिम वाद व्हावे, त्यांना हे दाखवायचे होते की, काश्मीरमध्ये नॉन मुस्लिम येऊ शकत नाही, जे लोक जात धर्म विचारून मारहाण करतात. त्याची आम्ही निंदा करतोय,त्या काश्मिरी आदिलने हिंदू-मुस्लिम पहिले नाही, जर कोणी हिंदू मुस्लिम करीत असेल तर, ते चुकीचे आहे. त्याची निंदा करतो.युद्ध हे सरकारवर सोडा, सरकार काय करणार हे सरकार ठरवणार आहे.

विरोधी पक्ष म्हणून आम्ही सरकारला सांगितले आहे. तुम्हाला काय करायचे करा, पण हा दहशतवाद कायमच संपवा. सरकारला त्यांचे काम करू द्या. पाकिस्तानला एफएटीएच्या ग्रे लिस्टमधे टाकणे आवश्यक आहे. मी भारत सरकारशी विनंती त्यांनी पाकिस्तानला ग्रे लिस्टेड करावे. सेल्फ डिफेन्समध्ये हल्ला करण्याचा अधिकारी आहे भारताला. इलिगल पैशातून अतिरेक्यांना मदत मिळत आहे.

सरकारने यावर ॲक्शन घ्यायला हवी.कोण आहे, हा शहीद आफ्रिदी ? काय या जोकराचे नाव घेत आहात.पंढरपूरच्या मंदिरात जसे ट्रस्टी हिंदू राहणारा नॉन हिंदू राहू शकत नाही. तसेच वक्फमध्ये नॉन मुस्लिम का? तुम्ही हिंदूच्या पंढरपूरमध्ये करू शकत नाही, तर, मग मुस्लिमसोबत वक्फ मधे का?लीमिटेशन अक्ट नुसार मालक बनविले आहे. नरेंद्र मोदींनी २ सी कायदा बनविला आहे. जो १२ वर्ष राहिला. हे चुकीचे आहे. पुरातत्व खात्याचं वक्फ नाही म्हणता, मग ते आमच्याकडून हिसकावलेच जात आहे. कुठे मुस्लिमाना दिले जात आहे. असे मत एम.आय.एम.चे अध्यक्ष असदुद्दीन ओवैसी यांनी व्यक्त केले.

# एलफिस्टन ब्रिजच्या व रहिवाशांच्या बाबतीत मुख्यमंत्र्यांबरोबर मीटिंग झाली

## आमदार कालिदास कोळंबकर यांची पत्रकार परिषदेत माहिती

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** एलफिस्टन ब्रिजच्या बाबतीत, रहिवाशांच्या बाबतीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर मीटिंग झाली.अशी माहिती आमदार कालिदास कोळंबकर यांनी माध्यमांशी बोलताना दिली.



यावेळी ते म्हणाले की, अधिकाऱ्यांशी चर्चा करून आलो, दुपारी एलफिस्टन ब्रिजच्या बाबतीत रहिवाशांच्या बाबतीत देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर मीटिंग झाली एकनाथ शिंदे, आशिष शेलार यांची उपस्थिती होती. त्या मीटिंगमध्ये सर्व पॉझिटिव्ह रिपोर्ट आले. मी पाच-सहा वर्षे अशा पद्धतीने म्हाडा आणि एमएमआरडीए अधिकाऱ्यांबरोबर बसून भविष्याचा प्लॅन केला आहे. तिथे खात्री कंपाऊंड आहे. दोन-तीन एकर चा प्लॉट आहे. या प्लॉट वरती शिफ्टिंग करून ते ३३(९) मध्ये बसून चांगली जागा मिळेल. जे गिरगावमध्ये झालं ते माझ्या नायगावमध्ये होऊ नये, अशी माझी इच्छा होती यात मला यश आले आहे. त्या दोन बिल्डिंगला पण या स्कीममध्ये मर्ज करा त्यांना जी जागा नियमात मिळते ती द्या, मुलांना शाळेत जावं लागतं, शाळेचा त्रास होता कामा नये, त्यासाठी वरळी भागात ट्रांजिस्ट असेल तिकडे शिफ्ट करा. शिफ्टिंग करायचे त्यांना आम्ही बोलावलं. त्यांना पण विश्वासात घेणार, काही रूम आशा आहेत. साडेपाचशे कार्पेटच्या रूम आहेत. त्यांना काहीतरी वाढून मिळाले पाहिजे. दुकानदारांना जे नियमाने २० टक्के आहे ते देणार तिथे कॉम्प्रोमाइज नाही, अधिकाऱ्यांसोबत सर्व जनतेला घेऊन निर्णय करता येणार नाही. प्रत्येक बिल्डिंगच्या एक एक दोन दोन व्यक्ती होत्या त्या पद्धतीने चर्चा झाली. मी त्यांना सांगितले सर्व लिहून द्या, आयुष्यात भविष्यात हे डेव्हलपमेंट करून देणार मगच कामाला सुरुवात करा ते लिहून द्यायला तयार आहेत.

आम्हाला कायदेशीर लिहून द्या मगच निर्णय घ्या तुम्ही काही द्याल तर मग चालणार नाही, शासन स्वतः देवेंद्र शिंदे यांनी जबाबदारी घेतली आहे,त्यांच्यावर विश्वास ठेवलाच पाहिजे. अधिकाऱ्यांना आम्ही काय सांगायचं ते सांगितलं आहे. ते ऑर्डर दिल्याशिवाय काही मोमेंट करू नका असं त्यांना सांगितलं आहे. हे जे मॅटर आहे. पाच सहा वर्षे या कामासाठी मी धावतोय. सुरुवातीला हा ब्रिज १६० फुटाचा होता जास्त बिल्डिंग जाऊ नयेत मी त्यांच्याशी वाद घालून १३० फुटाचा केला. त्यामुळे जास्ती कटिंग होणाऱ्या बिल्डिंग कमी झाल्या दोनच बिल्डिंग आता कटिंग होत आहेत. अशी माहितीही यावेळी आमदार कालिदास कोळंबकर यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

# फुले हा सिनेमा आग्रहाने सगळ्यांनी पहावा

## आमदार छगन भुजबळ यांचे आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**

**नाशिक/प्रतिनिधी :** फुले हा हिंदी चित्रपट आज प्रदर्शित झाला आहे. ठिकठिकाणी सर्व बहुजन समाजाचे आणि इतर समाजाचे लोक हा सिनेमा आपल्या मित्रमंडळी सोबत पाहत आहेत.सर्वांनी हा सिनेमा पाहावा, असे आवाहन माजी मंत्री तथा आमदार छगन भुजबळ यांनी केले आहे.

माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, १९५४ साली आचार्य अत्रे यांनी महात्मा फुले हा सिनेमा काढला. त्यात महात्मा फुले यांची भूमिका बाबुराव पेंढारकर आणि सावित्रीबाई फुले यांची भूमिका सुलोचन ताई यांनी केली होती. एका बाळासाहेब यांचे वडील दादा उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांनी देखील एक भूमिका केली होती.हे चित्रपट मराठी होते. मात्र, हा पहिला सिनेमा हिंदीत आहे. जो अनेक लोक जगभरात पाहू शकतात. फुले दांपत्याने दलित उद्धार, मुलींचे शिक्षण,बहुजन समाज शिक्षण, सती प्रथेला विरोध, विधवा केश वपन याला विरोध, बाल हत्या प्रतिबंधक गृह सुरू केले. अनेक क्षेत्रात या पती पत्नीने आपल आयुष्य वेचलं आहे. त्यावेळी शेनांचा मारा झाला. फुले यांच्या स्त्री शिक्षणाच्या कार्याला काही करमाठणी विरोध केला.

मात्र, काही ब्राम्हणांनी मदत केली. भवाळकर, भिडे यांच्यासारख्या ब्राम्हणांनी मदत केली. लहुजी वस्ताद हे मातंग समाजाचे होते. त्यांनी आपल्या व्यायामशाळेत असलेले लोक उभे



केले आणि मुलींच्या शाळेचे संरक्षण केले. वाजपेयी देखील म्हणाले होते, ज्यांना इतिहास समजत नाही, ते भविष्य घडवू शकत नाहीत. हा सिनेमा आग्रहाने सगळ्यांनी पहावा, या दोघांच्या बाबतीत काही गैर समज असतील किंवा माहिती नसेल तर ते कळणार आहेत. आपल्यावर किती लोकांचे उपकार आहेत हे कळणार आहे.

महिला राष्ट्रपती पदापर्यंत पोहोचल्या, त्याचे बीजारोपण महात्मा फुले पती पत्नीने केले आहे. त्यावेळेस काही गैर समज असतील. काही कर्मठ ब्राम्हणांनी विरोध केला, तसा बहुजन समाज, माळी समाजाने देखील त्यांना विरोध केला. त्यांच्या स्वतःच्या वडिलांनी त्यांना घरा बाहेर काढले. त्यानंतर ते एका मुस्लिम घरात त्यांना थारा मिळाला. फातिमा बेग या मुस्लिम महिलेने सावित्री बाईंसोबत नंतर काम केले. चित्रपटाला असलेला विरोध आता दूर झाला आहे.अशी माहिती माजी मंत्री छगन भुजबळ यांनी देऊन हा सिनेमा सर्वांनी पाहावा,असे आवाहन केले आहे.

# मुंबईत 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट'चे भव्य आयोजन

## पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्घाटनासाठी उपस्थित राहणार – उद्योग मंत्री उदय सामंत

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** मुंबई बीकेसी येथील जियो वर्ल्ड सेंटर येथे १ मे पासून ४ मे २०२५ पर्यंत 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट'चा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, या कार्यक्रमाचे १ मे रोजी उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आज बीकेसी येथे झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.



या कार्यक्रमाचे यजमानपद महाराष्ट्र शासनाकडे असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हे आयोजन होत आहे. पंतप्रधान मोदी १ मे रोजी संपूर्ण दिवसभर मुंबईत उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या सोबत परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर, केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचाही सहभाग राहणार आहे.

उद्योग मंत्री सामंत यांनी यावेळी स्पष्ट केले की, मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर आहे. विशेषतः हिंदी चित्रपटसृष्टीचे माहेरघर हे मुंबईला म्हटले जाते. भारतीय चित्रपट सृष्टीचे जनक दादासाहेब फाळके यांनी याच महाराष्ट्रामध्ये मराठी चित्रपट सुरू केले. त्यामुळे मनोरंजनाच्या क्षेत्रात मुंबई ही देशात अग्रगण्य शहर आहे. त्याचबरोबर, गेल्या तीन वर्षात महाराष्ट्रात परकीय गुंतवणूक ही एक नंबरला आहे. त्यामुळे उद्योग क्षेत्रात देखील महाराष्ट्र आणि मुंबई एक नंबरला राहिलेले आहे. पर्यटनाच्या दृष्टीने देखील महाराष्ट्र या देशाच्या पातळीवर अन्य देशांशी स्पर्धा करतो आहे. म्हणून पर्यटनाची सगळी स्थळे जागतिक पातळीवर जावी, हा देखील या वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट'चा उद्देश आहे. तसेच महाराष्ट्राची संस्कृती, महाराष्ट्राची सांस्कृतिक संस्कृती, औद्योगिक संस्कृती, पर्यटन संस्कृती आणि ज्या काही महाराष्ट्राच्या परंपरा आहेत, त्या जागतिक पातळीवर जाव्यात, यासाठी मुंबई शहराची निवड केंद्र शासनाने केलेली असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले

उद्योग मंत्री श्री. सामंत यांनी सांगितले की, या कार्यक्रमात ३३ देशांतील मंत्री व मंत्रीस्तरीय अधिकारी, तसेच १२० आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित राहणार आहेत. बॉलिवूड, टॉलीवूड, मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक दिग्गज कलाकार व निर्मातेही कार्यक्रमात सहभागी होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या चार दिवसीय सोहळ्यात भारत पॅव्हेलियन, महाराष्ट्र पॅव्हेलियन, तेलंगणा पॅव्हेलियन तसेच अन्य संस्थांचेही पॅव्हेलियन उभारण्यात येणार आहेत. त्यांचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी करणार आहेत. विविध क्षेत्रांतील परिसंवाद, राउंड टेबल कॉन्फरन्स, आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांचा समावेश असेल. विशेषतः तिसऱ्या दिवशी म्हणजे ३ मे रोजी नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियमवर ए. आर. रहमान यांच्या सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

''हा कार्यक्रम महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, औद्योगिक व पर्यटन क्षेत्राला जागतिक स्तरावर नेण्याची संधी आहे. या भव्य आयोजनासाठी राज्य शासनाला सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे,'' असे आवाहनही उदय सामंत यांनी केले.

## विविध वृत्त...

### नागरिकांना पाणी न मिळाल्यास तीव्र आंदोलन, मनसेचा इशारा

दैनिक आपला विदर्भ

**वर्धा/प्रतिनिधी :** बोरगाव मेघे गिट्टीखदान परिसरात नागरिकांना नळाचे पाणी मिळत नसल्याने मनसेने आक्रमक पवित्रा घेत महिलांसह जीवन प्राधिकरण कार्यालयात धडक देत पाणी देण्याची मागणी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. जीवन प्राधिकरण कार्यालयाच्या दालनामध्ये आंदोलन करण्यात आले. जोपर्यंत नागरिकांना पाणी मिळणार नाही, तोपर्यंत जीवन प्राधिकरण च्या कार्यालयातून जाणार नसल्याची मनसे जिल्हाध्यक्षांची पवित्रा घेतला होता. वारंवार निवेदन देऊन सुद्धा जीवन प्राधिकरण दखल घेत नसल्याने ठिय्या आंदोलन सुरू केल्याची माहिती मनसेचे जिल्हाध्यक्ष शंकर पोटफोडे यांनी दिली. नागरिकांना पाणी न मिळाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही मनसेच्यावतीने देत बोरगाव मेघे गिट्टीखदान परिसरातील नागरिक मटके घेऊन पोहोचले जीवन प्राधिकरणच्या कार्यालयात आंदोलन केले.

### शिष्यवृत्ती परीक्षेत मसीरा नाज प्रथम, डॉ.झाकीर हसैन ऊर्दु शाळेचा १०० टक्के निकाल



दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** येथून जवळच असलेले अंजनी बु.येथील डॉ. झाकीर हुसेन उर्दू प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यावतीने आयोजित केलेल्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत १०० टक्के यश संपादन केले आहे. तर, मसीरा नाज या पाचवीच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारली. मसीरा नाज़ शेख इब्राहिम आतारने प्रथम क्रमांक पटकविला आहे. त्याचबरोबर मुलांमध्ये शिबान अमजत शकील शाह याने प्रथम क्रमांक पटकावला. याशिवाय इफरा फातिमा सय्यद सादिकअशना ऐमन अब्दुल वासिम अशफिया अलबम अब्दुल तमीज अंसारी, फरहान खान मुख्तार खान, ज़िनत मकबूल शाह,खनसा नुरैन सैयद रहीम अतार ,नुसरत अंजुम मकबूल शाह ,राहुल खान जुनैद खान ,रीदा फातिमा शेख अशफाक ,मो. अबुजर अ तमीज़ ,तहुरा फातिमा शेख युसूफ अतार आदी विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचा संस्थेचे अध्यक्ष बशीर अहमद शेख, प्राचार्य सलाहुद्दीन शेख व शिक्षकांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

### पंतप्रधानांनी पाकिस्तान विरोधात कडक पावले उचलेली; महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तान विरोधात कारवाईसाठी कडक पावलं उचलेली आहेत.अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की, जो गरजते है ओ बरसते नही. पाकिस्तान फक्त गरजत आहे. पाकिस्तानची आर्थिक परिस्थिती प्रचंड कमजोर आहे. अनेक लोकांना तिथे जेवण मिळत नाही. तो देश काय दुष्मनी करणार आहे. काय युद्ध करणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तान विरोधात कारवाईसाठी कडक पावले उचलेले आहेत. प्रकाश आंबेडकर यांना विनंती करतो की, अशा वेळी कोणतेही राजकिय वक्तव्य करू नका, देशातील राज्यातील राजकारणी लोकांनी अशावेळी मोदींच्या पाठिंशी राहले पाहिजे. असे वक्तव्य करून भारताच्या जनतेला डी मोर्निंग करू नये, राणे कदम वाद स्थानिक विषचा आहे. असे मतही यावेळी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

### बुधवारचे दिव्यांग तपासणी शिबीर रद्द

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा रूग्णालयात नियमितपणे बुधवारी अस्थीव्यंग संबधित दिव्यांग तपासणी शिबीर घेण्यात येते. मात्र बुधवार, दि. ३० एप्रिल २०२५ रोजी अक्षय तृतीया निमित्त स्थानिक सुट्टी असल्यामुळे अस्थिव्यंग संबधित दिव्यांग तपासणी शिबीर रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी तपासणीसाठी येऊ नये, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. बि.एस. भुसारी यांनी केले आहे.

## वीज पुरवठा खंडीत केल्याने नुकसान भरपाईची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :**कोणत्याही प्रकारची पूर्व सूचना न देता दूध डेअरीचा वीज पुरवठा खंडीत केल्या मुळे झालेल्या नुकसानाची आर्थिक भरपाई देण्याची मागणी जीवन मिल्क अँड फूड प्रॉडक्ट प्रायव्हेट लिमिटेडचा वतीने २४ एप्रिल रोजी वीज वितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.

दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की रिसोड शहरा लगत करडा रोड वर जीवन मिल्क ॲण्ड फुड प्रोडक्टस प्रा.ली. रिसोड या नावाने दुध डेअरीचा उद्योग असून त्या जागी आपल्या ११ के.व्ही.टाऊन एक फिडर वरून दोनशे के.व्ही चे ट्रान्सफार्मर असून २३ एप्रिल रोजी दुपारी साडेचार वाजता आमच्या फॅक्ट्री समोरच ११ के. व्हीचे कंडेक्टर तुटले असता महावितरणचा कर्मचाऱ्यांनी तातडीने जोडले नाही.या उलट त्यांनी आमच्या फक्ट्री मध्ये येणारा विद्युत पुरवठा खंडीत केला व ११ के. व्ही टाऊन एक वरून फिडर सुरु केले.

या विषयाची त्यांनी मला कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना सुध्दा दिली नाही. याच कारणामुळे तसेच महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्याच्या हलगर्जी पणामुळे माझे ७८ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. तद्वतच दुसऱ्या दिवशी सकाळी अकरा वाजता माझ्या फॅक्ट्रीचा विद्युत पुरवठा सुरु करण्यात आल. माझा दुध डेअरीचा व्यवसाय असून सध्या उष्णता खुप मोठ्या प्रमाणात आहे.फॅक्टरी मधील अचानक विद्युत पुरवठा खंडीत झाल्यामुळे फॅक्टरी मधील दुध व दुग्ध जन्य पदार्थ खराब झाले.यात आमचे फार मोठे आर्थीक नुकसान झाले असुन याचा आम्हास मानसिक त्रास सुद्धा झाला आहे.

आमची फॅक्टरी आपल्या कंपनीची रिसोड शहरातील दोन नंबरचा मोठा ग्राहक असुन आता पर्यंत लाखों रुपयांचे वीज देयक आम्ही भरले आहे. झालेल्या नुकसानला वीज वितरण कंपनी व कंपनीचे संबंधीत अधिकारी कर्मचारी दोषी आहेत.आमच्या झालेल्या नुकसानाची भरपाई वीज वितरण कंपनीने त्वरीत द्यावी. अन्यथा आम्हाला कायदेशीर पाऊल उचलावे लागेल.असा इशारा दिलेल्या निवेदनातून देण्यात आला आहे.

## अकोल्यात किसान हार्डवेअरच्या दुकानाला लागलेल्या आगीत लाखोचं साहित्य जळून खाक



**अकोला/प्रतिनिधी :** अकोला शहरातल्या मच्छी मार्केटमधील एका हार्डवेअरच्या दुकानाला आग. मंगलदास मार्केटमधल्या वखारीया कंपाऊंडमधीलमच्छी मार्केटमध्ये आग. किसान हार्डवेअरच्या दुकानाला लागलेल्या आगीत लाखोंचं साहित्य जळून खाक झालं आहे. तर या आगीचं कारण अद्याप अस्पष्ट. घटनास्थळी आग विझविण्यासाठी महापालिकेचं अग्निशमन दलाने मिळवले आगीवर नियंत्रण.

## औषध जनजागृती कार्यशाळा संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत नुकतेच केमिस्ट भवन, चिखली येथे औषध जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी औषधे व सौंदर्य प्रसाधन कायदा १९४५, औषधे व आक्षेपार्ह कायदा, मेडीकल डिवायसेस कायदा २०१७, नार्कोटेक व सायस्कोट्रीपीक सबस्टेशन कायदा, औषधे व चमत्कारीक उपचार, आक्षेपार्ह जाहिराती कायदा १९५४ अशा विविध विषयावर सविस्तर माहिती देऊन मार्गदर्शन करण्यात आले.

सहायक आयुक्त(औषधे) गजानन प्र. घिरके मार्गदर्शन करताना म्हणाले, एमटीपी किट, सिलडेनफिल बटन कॅप, अल्पोझोनॉल, नायट्रोझेपान, इत्यादी महत्वाची औषधे विना बिल खरेदी करु नये. तसेच आरएमपी() डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय औषधी देऊ नये. डॉक्टराच्या चिठ्ठीशिवाय औषधे विक्री करणाऱ्या पेढीवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी सांगीतले.

शिबिरामध्ये स्त्री भृणहत्या रोखणे, जास्त प्रमाणात अलौपॅथीक औषधांचे सेवन करणे, एफडीए सॉप्टवेअरचा अभ्यास करुन अप्रमाणीत औषधे विक्री करु नये, अशा विविध विषयावर चर्चा करण्यात आले. कार्यशाळेसाठी चिखली तालुक्यातील केमिस्ट ॲन्ड ड्रगिस्ट, या परिसरातील फार्मासिस्ट यांचा समावेश होता. मार्च महिन्यामध्ये देऊळगांव राजा, सिंदखेडराजा, दुसरबीड व डोणगांव या गावात सुध्दा केमिस्ट संघटनेची औषध जनजागर कार्यशाळा घेण्यात आले.

## घरफोडी,वाहन चोरी व सोनसाखळी चोरीच्या अनुषंगाने नागरिकांना खबरदारी घेण्याचे पोलिसांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ



**वर्धा/प्रतिनिधी :** जिल्ह्यात विविध ठिकाणी घरफोडी,वाहन चोरी तसेच सोनसाखळी पळवून नेल्याच्या घटना समोर येतात पोलिसांकडून याबाबत अनेक वेळा खबरदारी घेण्याचे सूचना ही दिल्या जातात,पोलिसांकडून अनेक चोरी,घरफोडीच्या घटना उघडकीस आणून चोरट्यांना जेरबंद सुद्धा करण्यात येतात,सतत पेट्रोलिंग सुद्धा करण्यात येतात परंतू नागरिकांनी सुद्धा खबरदारी घेण्याची गरज आहे,सद्ध्या उन्हाळ्याचे दिवस असून नागरिक परिवारासह लग्न समारंभ,बाहेर फिरण्यासाठी जातात अश्या वेळेत चोरटे सदर घराची रेकी करून घरफोड्या करतात व सदर घटना परिवार परत आल्यावर माहिती पडतात अश्या वेळी नागरिकांनी आपल्या जवळील मौल्यवान वस्तू ,सोन्याचे दागिने रोख रक्कम सुरक्षित ठिकाणी,लॉकर मध्ये ठेवावे,घराला कुलूप लावल्यावर त्यावर परदा ठेवावा,दाराला सेंट्रल लॉक लावावा तसेच बाहेरगावी जात असल्यास शेजारी सांगून ठेवणे जास्त दिवसाठी बाहेर गावी जात असल्यास संमधीत पोलीस स्टेशनला माहिती द्यावी जेणेकरून पोलीस सदर ठिकाणी पेट्रोलिंग करतील,महिलांनी मार्केट किंवा रस्त्यावर जातांना सोन्याचे दागिने जपावे तसेच दागिने घालून निघणे टाळावे,तसेच ग्रामीण व शहरी भागात वाहन चोरीच्या घटना घडू नये यासाठी आपले वाहन लॉक करून व सुरक्षित ठिकाणी ठेवावे,तसेच अश्या घटना समोर आल्यास तात्काळ पोलिसांना कळवण्याचे आवाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप कापडे पोलीस स्टेशन सावंगी मेघे वर्धा यांनी केले आहे.

## झोपेच्या डुलकीने घेतला अजून एक बळी; समृद्धी महामार्गावरील घटना


दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**लोणार :** झोपेची ढोलकी लागल्याने ट्रक लोखंडी पुलावर जाऊन आढळल्याने झालेल्या अपघातात चालकाचा जागीच मृत्यू झाला सदर घटना समृद्धी महामार्गावरील दुसरबीड टोल नाक्याजवळील चायनैज नंबर ३१७.३ नागपूर कॅरिडोरवर २८ एप्रिल रोजी मध्यरात्री २.२० व दरम्यान घडली. फक्त माहितीनुसार एम.एच.- २० ईजी ५०७५ या क्रमांकाचा आयशर ट्रक बिडकीन जिल्हा संभाजीनगर येथून नागपूरच्या दिशेने जात असताना चालक गणेश गायकवाड व ४० बिडकीन जि. संभाजीनगर यांना सदर टोल नाक्याजवळ झोपेची डुलकी लागल्याने सदर आयशर



अनियंत्रित होऊन ना दुसरबीड इंटरचेंज जवळील आम्ही -१२ असा बोर्ड महामार्गाच्या साईडला लावलेला आहे. सदर बोर्डच्या लोखंडी पोल ला जोरदार धडक दिल्याने चालक गणेश गायकवाड जागेवरच ठार झाला व बाजुला बसलेले





मच्छिंद्र क्षीरसागर रा.पांग्रा जिल्हा संभाजीनगर हे गंभीर जखमी झाले. अपघात झाल्याची माहिती मिळताच तात्काळ समृद्धी महामार्गावरील यंत्रणा १०८ ॲम्बुलन्सचे डॉ. मंगेश काळे ,चालक सुभाष पांचाळ यांनी घटनास्थळी धाव घेऊन तात्काळ जखमेवर प्राथमिक उपचार केला. तसेच क्यूआरव्ही टीम दुसरबीड येथील श्रीकृष्ण बच्छिरे , तुषार तांदळे, नितीन बीसेन व पवन काळे यांनी सदर आयशर मधील अडकलेले मृतक यांना कटरच्या साह्याने पत्रा कट करून बाहेर काढले. व महामार्ग पोलीस चे पोलीस उपनिरीक्षक शैलेश पवार, पोलीस हेडकॉन्स्टेबल रोशन शेख ,संदीप किरके, अरुण भुतेकर व महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान पवन सुरुसे , जयकुमार राठोड यांनी सदर अपघात ग्रस्त आयशर क्रेनच्या साह्याने महामार्गाच्या बाजुला करून वाहतूक सुरळीत केली. व सदर मृतक व जखमी यांना पुढील उपचारा कामी सिदंखेडराजा येथे रवाना केले .सदर घटनास्थळी पोलीस स्टेशन किनगाव राजा चे अधिकारी व अमलदार हजर आले असून पुढील कारवाई करीत आहे.

समृद्धी महामार्गावर वाहन चालकांनी वाहन चालवताना शक्यतो दोन चालक सोबत घेऊनच वाहन चालवावे व पुरेशी विश्रांती व झोप घ्यावी .जेणेकरून एका चालकाला झोप आली तर, दुसरा चालक वाहन चालू शकतो. त्यामुळे होणारे अपघात ठळू शकतील त्याबाबत महामार्ग पोलीस चे प्रभारी अधिकारी एपीआय संदीप इंगळे. व स्टॉप हे सदर बाबत दररोज चालक व प्रवासी यांना सदर बाबत प्रबोधन करीत आहे.